नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - ३३१ | Issue - 331 | वार शनिवार दि. १९ एप्रिल २०२५ | Blow- Saturday Date 19 April 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाखांपर्यंतचे कॅशलेस उपचार

### गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई; सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अपघातग्रस्त रुग्णांसाठी एक लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार अंगीकृत व अन्य तातडीच्या रुग्णालयांमधून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने कार्यवाही करावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा मंत्री श्री. आबिटकर यांनी घेतला. यावेळी आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.दयानंद जगताप,




सार्वजनिक आरोग्य विभागाचे सहसचिव अशोक आत्राम, सहायक संचालक डॉ. रवींद्र शेटे आदि उपस्थित होते.

बैठकीदरम्यान मंत्री श्री.आबिटकर यांनी या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. यामध्ये योजनेतील अंगीकृत रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४१८० पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत ही निवड प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबविण्याचे त्यांनी आदेश दिले.

या योजनेतील उपचार संख्येत वाढ, दरामध्ये सुधारणा, अवयव प्रत्यारोपणासारखे महागडे उपचार समाविष्ट करणे, तसेच प्राथमिक आरोग्य सेवाही योजनेत समाविष्ट करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली असून एक महिन्याच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले. जनतेसाठी योजनेतील रुग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारी नोंदविण्यासाठी स्वतंत्र मोबाईल प विकसित करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. प्रत्येक अंगीकृत रुग्णालयाने दर महिन्याला एक आरोग्य शिबिर आयोजित करून किमान पाच रुग्णांवर कॅशलेस उपचार करावेत, अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे मंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी सांगितले.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात याव्यात. तसेच आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही मंत्री. श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले. रुग्णालयांना मार्च महिन्यापासून सुमारे १,३०० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आल्याचे सांगून, यापुढेही आवश्यक निधी वेळोवेळी दिला जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेची अंमलबजावणी पूर्ण पारदर्शकपणे केली जावी आणि कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी दिले. कर्करोग जनजागृती मोहिमेस गती द्या - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर कर्करोग संशयित, निदान झालेल्या व उपचारासाठी दाखल रुग्णांची तपशीलवार यादी ठेवावी. त्यांच्या दररोजच्या तपासण्यांचे अहवाल जसे हिमोग्लोबिन, रक्तदाब, रक्तशर्करा याबाबतची माहिती अचूकपणे भरावी. तसेच जिल्हास्तरावरील अधिकारी व उपसंचालक यांनी अधिनस्त संस्थांना भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी, असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आरोग्य अधिकाऱ्यांना दिले.

## शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी पैसे नाही, पण शक्तीपीठ मार्गासाठी सरकारला घाई; बच्चू कडूंचा सरकारवर निशाणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदेड : राज्यात शक्तीपीठ महामार्गाचा शेतकऱ्यांकडून विरोध कायम आहे. दुसरीकडे सरकार मात्र, शक्तीपीठ महामार्गासाठी आग्रही दिसत आहे. यावरुन प्रहार संघटनेचे अध्यक्ष, माजी आमदार बच्चू कडू यांनी सरकारवर गंभीर आरोप करत कडाडून टीका केली आहे. शेतकऱ्यांचं ३० हजार कोटी रुपयाचं कर्जमाफ करायला सरकारकडे पैसे नाहीत. पण, शक्तीपीठ महामार्गासाठी सरकारला घाई दिसत आहे. त्यांच्यासाठी रस्ता महत्वाचा नाही. पण, राज्यकर्त्यांना शक्तीपिठाचा पैसा वेगळ्या मार्गाने किती येईल हे महत्वाचं असल्याची टीका बच्चू कडू यांनी केली.

एका कार्यक्रमासाठी माजी आमदार बच्चू कडू आज नांदेडला आले होते. यावेळी त्यांनी ही टीका केली. शक्तीपिठाची मागणी नागरिकांची नाही. शक्तीपीठ मार्ग निर्माण करताना कोणाचं पीठ कोण दळून खाणार आहे हे महत्वाचं आहे. त्यांचं पीठाकडे लक्ष आहे, शक्तीकडे नाहीये. पीठा मधील येणारा काही हिस्सा राज्यकर्त्यांच्या वाट्याला येईल हे खरं आहे, असं म्हणत बच्चू कडू यांनी सरकारवर निशाणा साधला.

संतोष देशमुख हत्या प्रकरण राज्यभर गाजत आहे. त्यातच बीड जिल्ह्यात मारहाणीचे अनेक प्रकार समोर येत आहेत. लाऊडस्पीकरच्या आवाजावरून एका महिला वकिलाला मारहाण करण्यात आल्याची घटना बीडमध्ये घडली आहे. बीड जिल्यात अशी अनेक प्रकरणं घडत आहेत. हे पाहता बीडमध्ये एखादा माजी सैनिक ब्रिगेडियर नेमला पाहिजे अशी प्रतिक्रिया माजी आमदार बच्चू कडू यांनी दिली.

राज्य शासनातील अधिकारी बीडमधील प्रकरण मला वाटतं थांबवू शकेल. त्यामूळे सैन्य दलातील एखादा अधिकारी दिला, तर बीड तालावर येईल, असं देखील बच्चू कडू म्हणाले. यवतमाळमध्ये एका मुलीचा नदीत बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेवरुन बच्चू कडू यांनी नाराजी व्यक्त केली. देशात जाती धर्माच्या नावावर राजकारण होत असताना मोठी विषमता निर्माण झाली. एकीकडे अधिकारी आणि आमदारासाठी स्विमिंग टॅंक उपलब्ध आहेत. दुसरीकडे कपडे धुवायला सुध्दा घरात पाणी उपलब्ध होत नाही, असं दुर्दैव महाराष्ट्राच्या नशीबी असल्याचं ते म्हणाले.

निलंबित पोलीस उपनिरीक्षक रंजित कासले यांनी अनेक गंभीर आरोप केले आहे. या आरोपाचा तपास केला पाहिजे गंभीर प्रकरण आहे. मराठवाड्यात नवीन इतिहास होऊ नये हीच अपेक्षा आहे. बीडमधून नवीनच काहीतरी ऐकायला येतं. गृहखात फडणवीस साहेबांकडे आहे, दूध का दूध पाणी व्हायला किती वेळ लागतो, नाहीतर आमच्याकडे दोन दिवस द्या सगळं बाहेर काढू, असं बच्चू कडू म्हणाले. आमदार-खासदार अधिकाऱ्यांची पोरं दहा-दहा भाषा शिकतात. गरीबाच्या पोराला शिकवण्यासाठी काय अडचण आहे. तो त्यांच्या विषय आहे पालकांचा त्यांनी शिकवायचं की नाही? भाषा शिकल्याने मराठी अस्मिता जाते असं काही नाही, नेहमी मराठी भाषा वापरली पाहिजे याच्याबद्दल दुमत नाही. पाट्या मराठीत लावल्या पाहिजे त्याच्याही बद्दल दुमत नाही, पण काय शिकावं हे राज ठाकरे कसं काय ठरवणार? शाळेत जर्मनी भाषा शिकली म्हणून त्याची वाह वाह होते, पण हिंदी शिकवते म्हणून त्याच्यावर तुम्ही प्रश्न निर्माण करत असाल तर हे चुकीचं असल्याचं बच्चू कडू म्हणाले.

## न्यूरॉलॉजिस्ट डॉ. शिरीष वळसंगकर यांनी केली आत्महत्या; स्वत:वर गोळ्या झाडल्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरमधील प्रसिद्ध न्यूरॉलॉजिस्ट, मेंदूरोग तज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. डॉ. शिरीष वळसंगकर यांनी सोलापूरमधील स्वतःच्या निवासस्थानी दोन गोळ्या डोक्यात झाडून घेतल्या, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे. सोलापूर शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मेंदूरोग तज्ञ डॉ. शिरीष वळसंगकर यांच्या आत्महत्येमुळे सोलापूरमधील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

शहराच्या रामवाडी परिसरात असलेल्या वळसंगकर रुग्णालयाने अनेक मेंदूरोग रुग्णांना जीवनदान दिलं आहे. त्याच रुग्णालयाच्या डॉक्टरांनी टोकाचं पाऊल का उचललं? याबाबत अद्याप माहिती समोर आली नाही.



त्यांच्या आत्महत्येमागचं कारण अद्याप अस्पष्ट आहे. घरगुती कारणांमुळे डॉ शिरीष वळसंगकर यांनी अनेक दिवसांपासून प्रॅक्टिस कमी केली होती. त्यांची प्रॅक्टिस कमी झाली असतानाच त्यांच्या आत्महत्येची धक्कादायक घटना समोर आली आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर हे सोलापुरातील पहिले न्यूरॉलॉजिस्ट होते. डॉ. वळसंगकर यांनी मेंदूवर विविध आणि अत्याधुनिक पद्धतीने उपचार करण्यासाठी अत्याधुनिक रुग्णालय सुरू केलं होतं. सोलापूरमध्ये न्यूरॉलॉजी क्षेत्रात क्रांती घडवणारे डॉ. शिरीष वळसंगकर म्हणून त्यांची आेळख होती. त्यांच्या जाण्याने सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे.

डॉ. शिरीष वळसंगकर यांनी अनेक महिन्यांपासून वयोमानानुसार प्रॅक्टिस बंद केली होती. शुक्रवारी रात्री साडेआठच्या सुमारास त्यांनी राहत्या घरी बंदुकीतून दोन गोळ्या स्वत:च्या डोक्यात झाडून घेतल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. कुटुंबातील सदस्यांनी ताबडतोब डॉ. शिरीष वळसंगकर यांना जखमी अवस्थेत स्वतःच्या रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल केलं. मात्र उपचार सुरू असताना डॉ. शिरीष वळसंगकर यांची प्राणज्योत मालवली. डॉ. शिरीष वळसंगकर यांनी अशा प्रकारे आत्महत्या केल्याने सोलापूरसह संपूर्ण राज्यातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

## संरक्षण सामग्री उत्पादनांमध्ये देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**छत्रपती संभाजीनगरच्या उद्योजकांना संरक्षण मंत्र्यांचे निमंत्रण**

छत्रपती संभाजीनगर : उद्योगासाठी उत्तम परिसंस्था असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथील उद्योजक धाडसी व कल्पक आहेत. येथे डिफेन्स क्लस्टर तयार करून त्यांच्यातील क्षमतांना चालना द्यावी, अशी आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांना केला.

मराठवाडा : आत्मनिर्भर भारत की रक्षाभूमी', याविषयावर चेंबर ऑफ मराठवाडा इंडस्ट्रिज अँड अग्रीकल्चर तर्फे आयोजित चर्चासत्रात श्री.फडणवीस बोलत होते.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले की, येथील उद्योजकांच्या धाडसाचे कौतुक करायला हवे. संरक्षण उत्पादनांच्या उद्योगात भारत आत्मनिर्भर व्हावा, ही आपल्यातील तळमळ कौतुकास्पद आहे. आणि देशाला आत्मनिर्भर बनवण्यासाठी आम्ही कटीबद्ध,वचनबद्ध आहोत. आणि त्यात देशाला यश मिळत आहे. देशात उत्पादीत संरक्षण सामुग्री आता आपण निर्यात करू लागलो असून ही निर्यात आपण ६०० कोटी वरून २४०० कोटी पर्यंत वाढवली. संरक्षण क्षेत्रात लागणारी ५०० हुन अधिक उत्पादने देशातच बनवण्याचे आमचे धोरण आहे.आयात कमी करून ३ लाख कोटी पर्यंत संरक्षण उत्पादने वाढविण्याचे नियोजन आहे, असे त्यांनी सांगितले. श्री. सिंह म्हणाले की, येथील उद्योग परिसंस्था उत्तम असल्याचे दिसून येत आहे. आपल्या क्षमतांच्या सादरीकरणासाठी दिल्लीला यावे. असे त्यांनी सांगितले.




चर्चासत्रात प्रारंभी अध्यक्ष अर्पित सावे यांनी सादरीकरण करून डिफेन्स क्लस्टर साठी छत्रपती संभाजीनगर उत्तम व पोषक असल्याची भूमिका मांडली. (पान २ वर....)

### सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांची माहिती

## धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



बीड : महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाची बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका आला होता, अशी माहिती आता समोर येत आहे. धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूच्या झटक्यामुळे त्यांना बोलताही येत नसल्याची माहिती आहे. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी याबाबतची माहिती दिली आहे. बीडच्या कार्यक्रमाला धनंजय मुंडे गैरहजर राहिल्याचा प्रश्नाला उत्तर देताना धनंजय मुंडे यांची तब्येत बरी नसून त्यांना बोलताही येत नसल्याचं सांगितलं आहे. एबीपी माझाने याबाबतचं वृत्त दिलं आहे.

धनंजय मुंडे यांना नुकतंच बेल्स पाल्सीची लागण झाली होती. त्यातून ते बरे झाले होते. यानंतर धनंजय मुंडे नुकतेच परळीत कामालादेखील लागल्याचं बघायला मिळालं होतं. यानंतर आता धनंजय मुंडे यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. त्यामुळे त्यांना बोलता येत नसल्याचं बाबासाहेब पाटील यांनी सांगितलं आहे.

धनंजय मुंडे यांची तब्येत ठीक नाही. त्यांना पॅरेलेसिस झालाय. त्यांना बोलताही येत नाही. डोळे देखील वाकडे झाले आहेत. आपण दुसरंच बघतो. ते मुंबईला देखील बैठकीला येतात. ते फॅशन शोला दिसले असतील. जवळच्या माणसाने आग्रह केला असेल. त्यामुळे गेले असतील, असं बाबासाहेब पाटील म्हणाले आहेत.

धनंजय मुंडे हे बीडमधील मोठे नेते आहेत. त्यांना महायुती सरकारमध्ये महत्त्वाचं खातं मिळालं. पण बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे ते अडचणीत आले. या प्रकरणात धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असलेला वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली. कराड याने स्वत:हून सीआयडीकडे आत्मसमर्पण केलं होतं. यानंतर सीआयडीने या प्रकरणाचा तपास केला असता तोच या प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याची माहिती समोर आली. या प्रकरणात सीआयडीने वाल्मिक कराड याच्यासह इतर आरोपींना देखील अटक करत जेलमध्ये टाकलं आहे.

या हत्या प्रकरणाचे पुरावे देखील समोर आले. आरोपींनी किती भयानकप्रकारे संतोष देशमुखांना संपवले याचे फोटो समोर आले. यामुळे वाल्मिक कराडचा पाय आणखी खोलात केला. या प्रकरणाचे फोटो समोर आल्यानंतर धनंजय मुंडेंना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला. एकीकडे आरोपांच्या फैऱ्या झडत होत्या तर दुसरीकडे धनंजय मुंडे हे आजारी होते. त्यांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रिया देखील करण्यात आली. भाजप आमदार सुरेश धस यांच्याकडून धनंजय मुंडे यांच्यावर आरोप केले जात होते. तसेच इतरांकडूनही आरोप केले जात होते तर दुसरीकडे मुंडे हे आजारीदेखील होते. त्यामुळे ते दुहेरी चक्रव्युहात सापडले होते.

### अकोल्यात सर्वाधिक तापमानाची नोंद

### अवकाळीचे ढग राज्यापासून दूर

## उष्णतेच्या लाटेचा इशारा, ढगाळ वातावरणामुळे वाढणार उकाडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : मागील काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होताना दिसतोय. कधी पाऊस तर कधी ऊन अशी स्थिती निर्माण झालीये. मुळात म्हणजे होळीच्या अगोदर पारा वाढताना दिसला. त्यानंतर अचानक राज्यावर अवकाळीच संकट आले आणि जवळपास सर्वच भागांमध्ये अवकाळीने हजेरी लावली. काही ठिकाणी तर गारपिट देखील मोठ्या प्रमाणात झाली. ज्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. चंद्रपूर, जळगाव, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, लातूर, वाशिम याठिकाणी जोरदार पाऊस झाला.

चक्राकार वारे वाहत असल्याने कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले. वादळी वाऱ्यासह अनेक भागांमध्ये पाऊस झाला. अवकाळी पावसामुळे मार्च आणि एप्रिलमध्येही थोडासा थंडावा जाणवला. आता मात्र, अनकाळीचे ढग दूर गेले आहेत. यामुळे राज्यात परत एकदा उष्णता वाढल्याचे चित्र बघायला मिळतंय. मागील तीन ते चार दिवसांपासून उष्णता वाढतंय.



देशात सर्वाधिक तापमानाची नोंद ही राजस्थानच्या बिकानेरमध्ये झालीये. बिकानेरमध्ये ४५.१ अंश सेल्सिअस तापमान होते. अकोल्यामध्येही सूर्य आग ओकताना दिसतोय. अकोल्यात ४४.१ अंश तापमानाची नोंद झालीये. मागील काही दिवसांपासून विदर्भात पारा चढताना दिसतोय. परभणी, छत्रपती संभाजीनगर, मालेगाव, अमरावती, वाशिम याठिकाणीही ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आलीये. पुण्यात आज उन्हाचे चटके अधिक जाणवतील.

उन्हाचा पारा वाढत असतानाच आता भारतीय हवामान खात्याकडून अत्यंत मोठा इशारा हा देण्यात आलाय. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उष्ण आणि दमट वातावरणाचा येलो अलर्ट देण्यात आलाय. राज्यात काही भागांमध्ये आज ढगाळ वातावरण राहणार असल्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलीये. राज्यात उष्णता वाढत असल्याने नागरिकांनी यादरम्यान काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. पुढील काही दिवसांमध्ये राज्यात उष्णता अधिक वाढण्याचे देखील संकत आहेत. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील अनेक शहरांमध्ये ४५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान जाण्याचेही संकेत आहेत.

## संपादकीय....

### सर्वाधिक तापमान

देशात सर्वाधिक तापमानाची नोंद ही राजस्थानच्या बिकानेरमध्ये झालीये. बिकानेरमध्ये ४५.१ अंश सेल्सिअस तापमान होते. अकोल्यामध्येही सूर्य आग ओकताना दिसतोय. अकोल्यात ४४.१ अंश तापमानाची नोंद झालीये. मागील काही दिवसांपासून विदर्भात पारा चढताना दिसतोय. परभणी, छत्रपती संभाजीनगर, मालेगाव, अमरावती, वाशिम याठिकाणीही ४१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आलीये. पुण्यात आज उन्हाचे चटके अधिक जाणवतील. उन्हाचा पारा वाढत असतानाच आता भारतीय हवामान खात्याकडून अत्यंत मोठा इशारा हा देण्यात आलाय. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात उष्ण आणि दमट वातावरणाचा येलो अलर्ट देण्यात आलाय. राज्यात काही भागांमध्ये ढगाळ वातावरण राहणार असल्याची शक्यता देखील वर्तवण्यात आलीये. राज्यात उष्णता वाढत असल्याने नागरिकांनी यादरम्यान काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. पुढील काही दिवसांमध्ये राज्यात उष्णता अधिक वाढण्याचे देखील संकत आहेत. एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात राज्यातील अनेक शहरांमध्ये ४५ अंश सेल्सिअसपर्यंत तापमान जाण्याचेही संकेत आहेत.मागील काही दिवसांपासून हवामानात सातत्याने बदल होताना दिसतोय. कधी पाऊस तर कधी ऊन अशी स्थिती निर्माण झालीये. मळात म्हणजे होळीच्या अगोदर पारा वाढताना दिसला. त्यानंतर अचानक राज्यावर अवकाळीच संकट आले आणि जवळपास सर्वच भागांमध्ये अवकाळीने हजेरी लावली. काही ठिकाणी तर गारपिट देखील मोठ्या प्रमाणात झाली. ज्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले. चंद्रपूर, जळगाव, सांगली, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी, लातूर, वाशिम याठिकाणी जोरदार पाऊस झाला. चक्राकर वारे वाहत असल्याने कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आणि राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले.

## संरक्षण सामग्री उत्पादनांमध्ये देशाची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

(पान १ वरून...) संरक्षण सामग्रीसाठी लागणाऱ्या उत्पादनांची आयात कमी करून देश आत्मनिर्भर होत आहे. सद्यस्थितीत ५०० हून अधिक उत्पादने देशातच बनविले जात आहेत. संरक्षण सामुग्री निर्मिती क्षेत्रात अमर्याद संधी आहेत. त्यात छत्रपती संभाजीनगरच्या धाडसी उद्योजकांना सामावून घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात उद्योजकांच्या शिष्टमंडळाने दिल्लीला पुढील चर्चेसाठी यावे, असे आवाहन करत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी येथील उद्योजकांना निमंत्रण दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राचे उद्योग मॅग्नेट आता छत्रपती संभाजीनगर होत आहे.औद्योगिक वसाहतीसाठी संपादित केलेले १० हजार एकर क्षेत्र उद्योगांना वितरित झाले असून उद्योजकांकडून अजून मागणी होत आहे. त्यामुळे आणखी ८ हजार क्षेत्र उद्योगासाठी देण्याचे नियोजन आहे.येथे उत्तम उद्योग परिसंस्था आहे.मनुष्यबळ, दळणवळण, ऊर्जा अशी सर्व उपलब्धता आहे. त्यामुळे उद्योजक छत्रपती संभाजीनगरची निवड करतात. येथे आलेले उद्योजक येथलेच होऊन जातात

# डॉ. आंबेडकर कृषिक्रांतीचे जनक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ दलितांचे, अस्पृश्यांचे प्रश्नच सोडविले असे नाही, तर त्यांनी या देशाच्या विविध प्रश्नांचा मूलगामी विचार केला. त्यांची मूलभूत मांडणी केली. दिशादर्शन केले. त्यांची उकल कशी होईल याचा अंदाज मांडला. त्यासाठी ते अहर्निश कार्यरत राहिले. चळवळी केल्या. ग्रंथ लिहिले. भाषणे दिली. भाषावार प्रांतरचना, पाकिस्तानचा प्रश्न, काश्मिरचा प्रश्न, स्त्रीयांचे प्रश्न, शिक्षणाचे प्रश्न, मजुरांचे प्रश्न, पर्यावरणाच्या समस्या, जागतिक शांतता, दिवसेंदिवस ढासळत चाललेली नैतिक मूल्ये, पाणीवाटपाचे, धरणांचे, सार्वजनिक आरोग्याचे, लोकसंख्या वाढ आदी किती किती राष्ट्रीय प्रश्नांवर बाबासाहेबांनी आपल्या केवळ ६५ वर्षांच्या (१८९१-१९५६) आयुष्यात जीव ओतून नि जीव झोकून काम केले याला गणतीच नाही.

डॉ. बाबासाहेबांच्या आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलूंचा अजून सखोल अभ्यास व्हावयाचा आहे. जगभर या महापुरुषावर अध्ययन चालू आहे. त्यांचे कार्य हिमखंडासारखे आहे. डॉ. बाबासाहेब म्हणजे महासागर नि महासंगर. जगभरच्या या अध्ययनातून आता असे सिद्ध होत आहे, की बाबासाहेब बहुमुखी प्रतिभेचे धनी होते. भारताच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रगतीसाठी, समग्र उद्धारासाठी ज्या क्षेत्रांत नवीन परीवर्तनवादी विचारांची गरज होती त्या क्षेत्रासाठी त्यांनी आपल्या अनुभवातून, निरीक्षणातून नि व्यासंगातून आगळ्यावेगळ्या विचारांची मौलिक भेट दिली आहे. त्यांचे हे योगदान फार मोठे आहे.

कृषिक्षेत्राच्या संबंधात बाबासाहेबांनी जे अलौकिक कार्य केले त्याची अद्यापही अनेकांना ओळख नाही. बाबासाहेबांच्या कृषिविषयक चिंतनात कृषिक्रांतीची बीजे दडलेली आहेत असे मला नम्रपणे वाटते. भारतातल्या शेतकऱ्यांसाठी भरघोस कामगिरी करावी अशी बाबासाहेबांना अंतःकरणपूर्वक आस होती. शेतकरीवर्गाबद्दल आपले गुरु महात्मा जोतिराव फुले यांच्याप्रमाणेच त्यांना अपार आस्था होती, प्रेम होते, कळवळा होता. भारतीय संविधानाच्या काही अनुच्छेदांत शेतकरी कल्याणाचे दर्शन घडते. बाबासाहेबांच्या जाणीवपूर्वक प्रयत्नांचे हे फलित आहे.

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना बाबासाहेब म्हणत, शारीरिक कष्टांची कामे करणारा सारा वर्ग एक आहे. त्यांची दुःखे, वेदना समान आहेत. आर्थिक दडपणाखाली दडपल्या गेलेल्या वर्गाने तरी जातिभेद नि धर्मभेद यांना आपल्या जीवनात बिलकुल थारा देऊ नये. डॉ. आंबेडकरांनी या देशाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला. सामान्य शेतकरी आणि भूमिहीन यांची हलाखी पाहिली. त्यासाठीच त्यांनी १९३६ साली 'स्वतंत्र मजूर पक्षा'ची स्थापना केली होती. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांपासून वंचित असलेल्यांसाठी त्यांनी लढे पुकारले.

जमीनदारांनी चालवलेल्या कुळांच्या छळाविरुद्ध, पिळवणुकीविरुद्ध आवाज उठवला. महारांच्या गुलामीचे मूळ असलेली महार वतने बिल बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाने मांडले. एवढेच नव्हे तर सरकारने या वतनी जमिनीवर जादा महसूल आकार वाढवला तेव्हा हरेगाव, तालुका श्रीरामपूर, नगर येथे राज्यातील महारांची जुडीपट्टी विरोधी परिषद बाबासाहेबांनी आयोजित केली. कोकणातील खोतांच्या कचाट्यातूनही त्यांनी शेतकऱ्यांना मुक्त केले. बाबासाहेबांच्या या पक्षाच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांच्या हिताची अनेक धोरणे होती. भूतारण बँका, शेतकऱ्यांच्या सहकारी पतसंस्था व खरेदी विक्री संघ यांची स्थापना व शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीचे कायदे यांचा समावेश होता. दि. १० जानेवारी १९३८ रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षाने वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा विधानसभेवर नेला होता. मोर्चाच्यावतीने डॉ. आंबेडकरांनी काँग्रेस मंत्रिमंडळाला शेतकऱ्यांच्या ४ मूलभूत मागण्या व १३ तातडीच्या मागण्या सादर केल्या होत्या.

भारतीय शेती शेतकऱ्याला पुरेसे अन्न देऊ शकत नाही, त्याच्या गरजा भागवीत नाही याची बाबासाहेबांना पुरेपूर कल्पना होती. म्हणून शेतीकडे उत्पादनाच्यादृष्टीने पाहिले पाहिजे असे ते म्हणत.

शेती करणारांनी शेतीतील गुंतवणुकीचा बारकाईने शोध घ्यावा, असे त्यांचे सांगणे असे. आपली जमीन किती, भांडवल किती लागेल



याचा शेतकऱ्यांनी अंदाज घेणे गरजेचे आहे. भारतातील शेती कशा प्रकारची आहे, त्या शेतीतून कोणत्या प्रकारचे पीक घेतले जावे याविषयी शास्त्रीय आधारावर चिकित्सा होणे महत्त्वाचे आहे. कोणते पीक घ्यावे? ते किती घ्यावे? जमीनधारणा कशी असावी? भाडेपट्टधारकाने घेतलेल्या जमिनीचा काळ किती असावा? उत्पादन घटकांचे एकमेकांशी प्रमाण कसे असावे? इत्यादी प्रश्नांचा त्यांनी सखोल अभ्यास केला. अल्पभूधारणा, मोठ्या प्रमाणावरील जमिनीचे लहान-लहान तुकडे हीच शेती व्यवसायाची व शेतकऱ्यांपुढची समस्या आहे, असे सार त्यांनी काढले होते. जमिनीच्या एकत्रीकरणाचा विचार करत असतानाच कोणाचेही नुकसान होणार नाही याचा शास्त्रोक्त पद्धतीने विचार करून मार्ग काढावा, असे ते सांगत. कुटुंबातील किती व्यक्ती शेतीकरिता उपयोगी आहेत याचाही विचार व्हावा, असे ते म्हणत.

भारतासारख्या शेतीप्रधान देशात जमीन हे केवळ उत्पादनाचे साधन नसून मालकी हक्कामुळे सामाजिक दर्जा, प्रतिष्ठा प्राप्त होत असते म्हणून प्रथमतः अस्पृश्यांना जमिनी मालकीने देण्यात याव्यात अशी त्यांनी सूचना केली. सामुदायिक शेती, राष्ट्रीयीकरण, शासनामार्फत खर्चाची तरतूद या मुद्यांनाही त्यांनी आपल्या राज्य समाजवादाच्या संकल्पनेत वाव दिला होता. कालानुक्रमे शेतीविषयक त्यांच्या विचारात क्रांतिगर्भ विकास आहे. देशातील जमीनसुधारणा कायदे, कुळकायदे, भूदान चळवळ, सहकारी शेती यांसारख्या विवध मार्गांनी परंपरागत स्वरूपाची भारतीय अर्थरचना कितपत बदलेल याविषयी त्यांनी एकदा शंका व्यक्त केली होती. शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करण्यासाठी शेतीवर आधारित उद्योगधंदे झपाट्याने वाढवावेत असा सल्ला त्यांनी ८४ वर्षांपूर्वी दिला होता. शेतकऱ्यांच्या सर्वच प्रश्नांची दखल बाबासाहेबांनी घेतली. दुसरा कोणताच पर्याय नसल्यामुळे भारतात लहान शेतीवर मोठ्या प्रमाणावर लोक अवलंबून आहेत. मग शेतकऱ्यांचे राहणीमान कसे सुधारेल? या चिंतेने ते व्यथित होत.

डॉ. पंजाबराव देशमुख (१८९८-१९६५) हे शेतकऱ्यांचे मोठे कैवारी होते. त्यांच्या नावाने अकोला येथे मोठे कृषिविद्यापीठही स्थापन झाले आहे. भारताच्या घटना समितीवरही ते होते. घटना निर्मितीच्या वेळी शेती विषयावर व शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या योजना मांडल्या जात. पंजाबरावांनी विनंती करताच त्यांनी मांडलेल्या कल्याणप्रद कायद्याच्या प्रस्तावास बाबासाहेबांनी कायदेमंत्री या नात्याने त्वरित मंजुरी दिली होती. भारताचे कृषिमंत्री झालेल्या पंजाबरावांना बाबासाहेबांविषयी कमालीचा आदर होता. बाबासाहेबांनी विनंती करावी व पंजाबरावांनी लागलीच ती मान्य करावी असेच घडत गेले.

डॉ. बाबासाहेबांनी दिल्लीमधील त्यांच्या शासकीय निवासस्थानावर शोभेची हिरवळ काढून तेथे गव्हाचे पीक घेतले होते. अनेक भाज्या नि पालेभाज्याही आवडीने घेतल्या होत्या. त्याचा संपूर्ण हिशोब त्यांनी लिहून ठेवला होता. औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयात त्यांचा मुक्काम असला, की अनेक मंडळी त्यांना भेटावयास येत. एकदा त्यांनी अट घातली, ज्यांना मला भेटावयाचे आहे, त्यांनी किमान एक झाड विद्यालयाच्या परिसरात लावावे. 'नागसेनवन' असे नंतर परिपूर्ण साकारले. जेथे शास्त्रीय पद्धतीने पिके घेतली जात त्या स्थळांना ते आनंदाने भेट देत. भारतीय कृषी अनुसंधान संस्था, पुसा इन्स्टिट्यूट यांच्याबद्दल त्यांना अपार आपुलकी वाटे. 'अधिक धान्य पिकवा' ही बाबासाहेबांचीच मोहीम होती. मोर्चाच्या वेळी शेतजमिनीची काळजी घेण्यास ते सांगत.

खोती पद्धत आणि महार वतने यांच्या निर्मूलनात त्यांनी बजावलेली भूमिका त्यांना एक नामांकित कृषित' रचते हे डॉ. नरेंद्र जाधव यांचे मत रास्तच आहे.

शेती आणि शेतकऱ्याच्या संरक्षणाचा ज्या कायद्यांचा बाबासाहेबांनी स्वातंत्र्यपूर्वी आग्रह धरला त्यातील बरेच कायदे स्वातंत्र्यानंतर अंमलात आले. शेतमजुरीचे दर तुकडेबंदी, खरेदी-विक्री, शेतीकामासाठी आधुनिक अवजारे व साधने याबाबत बाबासाहेबांचे द्रष्टेपण पुढे दिसून येते.

शेती व्यवसायाचे महत्त्व वाढावे, सर्व शेतकरी वर्ग: पर्यायाने भारत सुखी व्हावा म्हणून डॉ. आंबेडकर केवळ 'प्रार्थना' करीत नव्हते. भारतीयांच्या सुखासाठी त्यांनी शेवटपर्यंत प्रत्यक्ष कार्य केले.

मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी म्हटले आहे, 'शेतीवर डॉ. आंबेडकरांनी केलेल्या मूलभूत भाष्यानंतरच्या काळात शेतीक्षेत्रात अत्यंत महत्त्वपूर्ण आणि गुणात्मक बदल झाले आहेत. उदा. हरितक्रांती, जमीन सुधारणाविषयक कायदे वगैरे. परंतु बाबासाहेबांनी 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रिमिडीज' (१९१८) या आपल्या प्रदीर्घ निबंधात शेतीविषयक उपस्थित केलेले काही मूलभूत प्रश्न तसेच आहेत असे नसून तीव्रतर झाले आहेत. इतकेच नव्हे तर त्यांच्या लेखनातील ताजेपणा आणि विश्लेषणाची व्याप्ती व खोली लक्षात घेता ते ८४ वर्षांपूर्वी जेवढे मार्गदर्शक होते, तेवढेच किंबहुना त्याहीपेक्षा अधिक आज मार्गदर्शक आहेत, असे म्हणणे रास्त ठरावे.'

जागतिक कीर्तीच्या संशोधक डॉ. गेल ऑमव्हेट यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ घटना लिहिणारे घटनातज्ज्ञ होते असे म्हणणे किंवा ते केवळ दलितांचे नेते व कैवारी होते असे म्हणणे म्हणजे त्यांचे अवमूल्यन करण्यासारखे आहे. ते ठामपणे सर्व जातीजमातीच्या कामगार आणि शेतकऱ्यांचे नेते होते. ' असे १९८८ मध्येच अभ्यासपूर्वकरित्या नोंदवले आहे.

सर्व थरातील सोशिक, उपेक्षित जनतेला न्याय मिळाला पाहिजे ही भूमिकाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र जीवनाचे तत्त्वज्ञान होते. भारतीय शेतीचे त्यांनी याच दृष्टिकोनातून चिंतन केले असे म्हटल्यास ते अप्रस्तुत ठरू नये.

**लेखक – सतीश कुलकर्णी, वाई**

## टाटा पॉवरने राज्यभरात २३० पेक्षा जास्त महत्त्वाच्या पायाभूत सोयीसुविधा; महाराष्ट्रातील हरित ऊर्जा परिवर्तनाची गती वाढवली



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : सार्वजनिक पायाभूत सोयीसुविधांना सौर ऊर्जा सक्षम बनवण्याच्या महाराष्ट्र राज्य सरकारच्या उपक्रमाच्या समर्थनार्थ, टाटा पॉवरने राज्यभरात २३० पेक्षा जास्त सार्वजनिक संस्थांना यशस्वीपणे सौर ऊर्जा सक्षम बनवले आहे. हे महत्त्वाकांक्षी पाऊल उचलून टाटा पॉवरने एकूण जवळपास १०७ मेगावॅट शुद्ध ऊर्जा क्षमतेचे योगदान दिले आहे. सौर ऊर्जा सक्षम संस्थांमध्ये प्रमुख जिल्ह्यांमधील १०० रुग्णालये (३.६ मेगावॅट), ६४ शाळा (२ मेगावॅट) आणि ७२ सरकारी व इन्स्टिट्यूशनल इमारतींचा (१०० मेगावॅट) समावेश आहे.टाटा पॉवरची ही सर्व इन्स्टॉलेशन्स एकूण १.३ लाख टन कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जन रोखत आहेत, ज्यामुळे होणारा प्रभाव २० लाख झाडे लावण्याइतका आहे.

हे प्रयत्न भारतातील शुद्ध ऊर्जा परिवर्तनाला सक्षम बनवण्याच्या आणि समुदायावर केंद्रित सस्टेनेबिलिटीचे समर्थन करण्याप्रती टाटा पॉवरच्या सर्वसमावेशक वचनबद्धतेचा एक भाग आहेत. देशातील सर्वात विश्वसनीय आणि जबाबदार ऊर्जा कंपन्यांपैकी एक, टाटा पॉवर महत्त्वपूर्ण सार्वजनिक सुविधांना सौर ऊर्जा सक्षम बनवून, ऊर्जेसाठी येणारा खर्च कमी करण्यात, ऊर्जा विश्वसनीयतेमध्ये सुधारणा करण्यात आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यात मदत करत आहे. ही कंपनी व्यावहारिक आणि पुढे वाढवली जाण्यायोग्य अक्षय ऊर्जा सोल्युशन्स देण्यासाठी सरकारी संस्थांसोबत मिळून काम करत आहे, अशा संस्था ज्या महाराष्ट्राच्या हरित विकास अजेंड्यामध्ये सार्थक योगदान देत आहेत.

टाटा पॉवरने संपूर्ण भारतामध्ये १.५ लाख सौर ऊर्जा इन्स्टॉलेशन्सचा टप्पा पार केला आहे, देशातील नंबर १ रुफटॉप सौर ऊर्जा कंपनी म्हणून टाटा पॉवरचे स्थान यामुळे अधिक मजबूत झाले आहे. जवळपास ३ गिगावॅटच्या एकूण संस्थापित रुफटॉप क्षमतेसह, ही कंपनी भारताच्या स्वच्छ ऊर्जा महत्त्वाकांक्षांना पूर्ण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे. टाटा पॉवर सोलरूफ व्यवसायाने ७०० पेक्षा जास्त शहरांमध्ये आपले मजबूत स्थान निर्माण केले आहे. टाटा पॉवर सोलरूफ ग्राहकांना वीज बिलांवर ८०% पर्यंतची बचत, सौर मोड्यूलवर २५ वर्षांची वॉरंटी देते आणि त्यासोबतच या कंपनीने ३०० पेक्षा जास्त शहरांमध्ये ५७५ पेक्षा जास्त चॅनेल भागीदारांची एक मजबूत इकोसिस्टिम तयार केली आहे, ज्यामुळे अंतिम युजरपर्यंत विश्वसनीय वितरण आणि सेवा निश्चितपणे पोहोचवल्या जातात.

## राजधानी दिल्लीशी डॉ. बाबासाहेबांचे जिव्हाळेचे नातं.....

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. आंबेडकर यांच्या जीवनात काल दिल्लीत गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि दिल्लीचे एक नातेही निर्माण झाले. ब्रिटीश सरकारच्या म्हणजे प्रांतीय मंत्रिमंडळात त्यांचे अधिकारी होते. या भेट ते मुख्यमंत्री फिरत होते. तुमच्या समस्या जाणून घ्या आणि निर्णय घेतला.

दिल्लीत असताना डॉ आंबेडकर यांनी या देशाला उभारणीत पवित्र दिले. त्यांनी देशावर दीर्घकालीन परिणाम निर्णय घेतला. मग ते महिला कायदे असोत की अधिकाराचे निर्णय असोत. साहेब आंबेडकर राज्य यांनी अहोरात्र मेहनत करून मसुदा तयार केला तसेच हिंदू कोड बिल तयार केले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा दिल्लीत आले तेव्हा त्यांना आराम मिळतो. माता रमाईचे नियम असे पर्याय म्हणून खूप दुखावले होते. पण आपल्या कृती सुधारणेसाठी मुंबई नियमितपणे डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागत असे. दोनच डॉक्टर मालवणकर यांच्याकडे डॉ. सविता कबीर यांच्या सव्वा प्रश्न आंबेडकर यांच्या भेटी आणि त्यांचे न्यायालय मॅरेज ऑन. याचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले अनेक ग्रंथ लिहिले आहेत. देशाच्या फाळणीवरून त्यांचा प्रसिद्ध ग्रंथ त्यांनी दिल्लीत पूर्ण केला. भविष्यात त्यांचा शेवटचा शेवटचा जगप्रसिद्ध लेखक ग्रंथ बुद्ध आणि त्यांचा धम्म दिल्लीतच लिहिला. या दिल्लीतील लोक त्यांचे संबंध आले. हे नाते दृढ होत गेले.

उत्तर भारतीयांचा गोवळा त्यांच्या चहूकडे असताता. त्यांना बघायला , ऐकायला , भेटायला लोक सतत येत असतात. १ हार्डिंग एवेन्यु (गुबंद कोठी) येथे होते . सध्या याला टिळक मार्ग म्हणतात. त्यांचे शेवटचे दिवस सीव्हील लाईन्स येथील २६ अलीपुर रोड येथील कोठीत गेले. भारताच्या बळावर स्म



रणार्थ या ठीकाणी ऑडियो बांधले आहे.

दिल्लीत असताना लोकांचा त्यांच्या परीचय. हा ऋणबंधन वाढीला. अनेकांना आपले सुख दुःख सांगतो. त्यांच्या आट कार्टरमध्ये त्यांचे निकटवर्ती सोहनलाल शास्त्री , जे विधी अधिकारी होते , ते आरामात असतात. त्यांचा मित्र जवळीकतेचा स्नेह होता. त्यांचेच होत चौधरी देवीदास जी पोलिस ही लोकशाहीचे दिल्लीतील घटक जाणे असे. चौधरी देवीदासंद मुलगा लाला हरीच आणि सुन भुरिया देवी यांना २ ग्रीष्म १९४९ ही आनंदाची संवादांना दयनीय होती. त्या दिवशी वेबसाइट दिल्लीत. ते दोन दिवसांसाठी काश्मीर दौऱ्यावर होते. चौधरी देवी दास यांनी लाडूचा डबा निवडणूक आयोगांचे घर उठले. तेव्हा त्यांचे मित्र आणि आप्तां बरोबरीत डंग होते. बौद्ध चौधरी देवीदास यांना गेट येताना बघून देवीदास अभिवादन स्वीकारले. देवीदास हे अंत्य हर्षवाल्यांना सांगू लागले की त्यांना नातु कळते. मिठाई त्याची आनंदात आणली आहे. मानसिकता आरोग्य त्यांनी ती खाल्ली नाही मात्र , स्थानामध्ये वाटून दिली. नातवाचे नाव गुलाब सिंग सिंगर आले चौधरी नी बाबासाहेबांना सांगितले. मला आदराने विचारले , आई आणि बाळही बरे आहेत ना. वी चौधरी यांनी होकारार्थी उत्तर दिले.

बाबासाहेब म्हणाले , गुलाब सिंग हे नाव काही बरे वाटत नाही. त्यांनी बाजु वर्तमान पत्ररूपले हे शांतीस्वरूप नाव वाचले आणि चौधरी यांना सांगितले की आता तुम्ही नातवाचे नाव गुलाब सिंग हे न ठेवता तु शांतीस्वरूप असे ठेवले. त्याप्रमाणे चौधरी देवीदास यांनी कागदोपत्री नाव बदलून शांतीस्वरूप हे नाव ठेवले.

शांतीस्वरूप यांनी सरकारच्या गृह खात्याची भारत केली. निवृत्त नाव त्यांनी 'सम्यक' या संस्थेने सुरू केले. उत्तर भारतातील नवोदत लेखकांना त्यांनी दिली. वर्ष २०२० मध्ये त्यांचे नियम येथे दिल्ली. आता त्यांची प्रकाशन संस्था आहे. हयात असे ते सर्वांना मोठया अभिमानाने सांगतो , मला ' स्वरूप ' हे नाव शांतीने ठेवले आहे. अशा अनेक स्नेमी आंबेडकर यांच्या दिल्लीतील आहेत.



प्रज्ञा सूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्व स्तरातील लोकांमध्ये लोकप्रिय होते. आजही राजधानीत त्यांच्या संसदेपासून ते दिल्लीतील लोकांमध्ये जाग्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंत अभिनंदन !

**– अंजु निमसरकर-कांबळे माहिती अधिकारी**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...




### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळविली

सोलापूर : कुचन नगर येथे हँडलॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी व्ही ९८५८) ही चोरून नेल्याची घटना १६ मार्चला घडली. याप्रकरणी स्वामी रवी पोतन (वय २८, रा. कुचन नगर) याने जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली.त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### फडकुले सभागृह येथून दुचाकी पळविली

सोलापूर : फडकुले सभागृह येथे हॅन्डल लॉक करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच १३ सी डी ५८९४) ही चोरून नेल्याची घटना १७ मार्चला घडली. याप्रकरणी आकाश मोहन कंडीकटला (वय २८, रा. जुना विडी घरकुल) याने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्याच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

### चोरट्याने घरातून मोबाईल पळविला

सोलापूर : संजय गांधी नगर विजापूर रोड येथून घरामध्ये ठेवलेला आठ हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरून नेल्याची घटना १७ एप्रिलला घडली. याप्रकरणी पार्वती गंगाराम कोकणे (वय ४६ रा. संजय गांधी नगर, विजापूर रोड) यांनी विजा-पूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून गणपत रामलिंग गायकवाड (वय २७, रा. रामवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या सोलापूर जिल्हा दौरा ठरणार शिवसैनिकांना ऊर्जा देणारा : जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजीराव सावंत

## माढा येथे पृथ्वीराज सावंत यांच्या राजवी ॲग्रो ऑइल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा भूमिपूजन कार्यक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे सोमवार दिनांक २१ रोजी होणाऱ्या जाहीर सभेची जोरदार तयारी माडा येथे सुरू आहे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सकाळी साडेअकरा वाजता पृथ्वीराज सावंत यांच्या राजवी ॲग्रो ऑइल प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा भूमिपूजन कार्यक्रम माढा येथे होणार असून यानंतर त्या ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जाहीर सभा होणार आहे.

या सभेसाठी माढ्यातील शेटफळ रोड १५० बाय५०० चौरस फुटाचा भव्य मंडप उभारण्याचे कामसुराई तसेच ६० बाय ४० चौरस फुटाची भव्य व्यासपीठ उभारण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ऐकण्यासाठी हजारो शिवसैनिक येणार आहेत. या मंडप उभारणीच्या कामास शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी शुक्रवारी भेट देऊन पाहणी करत सूचना दिल्यावर प्रचंड ऊन असल्यामुळे शिवसैनिकांना पिण्याचे पाण्याची व भोजनाची पार्किंगची तसेच



सावलीची सोय योग्य प्रकारे होण्याबाबत प्रा. सावंत यांनी वैयक्तिक लक्ष घालून व्यवस्थित बाबत सूचना दिल्या.






# भारताचे माजी क्रिकेटपटू केदार जाधव यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे घेतले दर्शन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारताचे माजी क्रिकेटपटू मा श्री केदार जाधव सर यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी त्यांचा शाल व श्री विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन त्यांचा यथोचित सन्मान केला तसेच विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य संभाजीराजे भोसले यांनी मंदिर समितीचे दिनदर्शिका व डायरी देऊन येतोचित त्यांचा सन्मान करण्यात आला.

# उत्तर सोलापूर तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे २२ एप्रिलला आरक्षण सोडत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी दुपारी १२.०० वाजता बहुउद्देशिय सभागृह जुने जिल्हाधिकारी कार्यालय सोल-ापूर येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

सन २०२५ ते सन २०३० या कालावधीमध्ये मुदत संपणा-या ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी महाराष्ट्र ग्राम पंचायत (सरपंच/उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मध्ये सरपंच पदाच्या आरक्षणबाबत तरतुदी निश्चित केल्या आहेत. सदर नियमान्वये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, नागरीकांचा मागास प्रवर्ग, खुला व महिला (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व नागरीकांचा मागास प्रवर्गाच्या स्त्रीयांसह ) सरपंच पदे निश्चित करावयाची आहेत. तालुक्यातील पदाधिकारी व नागरिकांनी ग्राम पंचायत सरपंच आरक्षण सोडत कार्यक्रमास निश्चित केलेल्या दिनांकास वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन तहसिलदार, उत्तर सोलापूर यांनी केले आहे.

# मा. आ. प्रशांत परिचारक व आमदार अभिजीत पाटील यांच्या हस्ते पंढरपूर येथील 'हॉटेल पंढरीपुरा पॅलेस'चा उद्घाटन सोहळा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मा श्री अविनाश कुंभार यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात म्हणाले की वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी हे मी नवीन हॉटेल ही सुरुवात केली आहे. त्यांनी हा प्लॉट घेऊन ठेवला होता व तो मला मिळाल्यामुळे ते वडिलांचे स्वप्न मी स्वतः जन-तेचे सेवा करण्यासाठी स्वतःची हॉटेल मी पंढरपूर येथे येणाऱ्या लोकांची सेवा करण्यासाठी तयार केले आहे.

त्यांच्या ह्या नवीन व्यवसायासाठी मा श्री सुभाष मस्के सर यांनी त्यांना शुभेच्छा पर भाषण करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

मा आ. प्रशांत परिचारक यांनी अविनाश कुंभार यांचे त्यांच्या वडिलांपासूनची संबंध आमच्या घराण्याची असल्याम ुळे आम्ही त्यांचे या नवीन हॉटेल व्यवसायासाठी त्यांनी घेतलेल्या लॉज, रेस्टॉरंट, बकेट हॉल हे पंढरपुरातील येणाऱ्या जनतेची सेवा करण्यासाठी व त्यातून आर्थिक उत्पन्न मिळवून सेवा देण्याची संधी अविनाश कुंभार यांनी महाराष्ट्राचे आराध्य दैवत व दक्षिणकाशी समाजाला जाणाऱ्या पंढरपूरमध्ये लाखो भाविक दररोज ये जा करत असतात व त्यांची सेवा करण्याची संधी मा श्री अविनाश कुंभार यांना त्यांच्या वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी त्यांना वडिलांच्या आशीर्वादाच्या रूपाने त्यांना मिळालेले आहे त्यांनी संधीचे सोने करावे असे प्रशांत परिचारक यांनी बोलताना मत व्यक्त केले मग पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी श्री माने देशमुख यांनीही हॉटेल व्यवसाय ही पंढरपुरात अतिशय चांगल्या पद्धतीने चालणारा व्यवसाय आहे व महाराष्ट्रातील दैवत समजल्या जाणाऱ्या विठ्ठलाच्या पावन नगरी त्यांना ही संधी त्यांच्या वडिलांच्या आशीर्वादाने मिळाले आहे त्यांनी ती सेवा म्हणून करावी अशी त्यांनी शुभेच्छा दिल्या. अनेकांनी श्री अविनाश कुंभार यांना हॉटेल व्यवसायासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत तारीख जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत सरपंच पदाचे आरक्षण सोडत सांगोला तालुक्यातील २०२५. २०३० या पंचवार्षिक कालावधीसाठी ग्रामपंचायत सरपंच पदाची आ-रक्षण निश्चित करण्यासाठी दिनांक २२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी बारा वाजता.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर स्मृती भवन सांगोला येथे आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

यासोबत कार्यक्रमासाठी तालुक्यातील सर्व इच्छुक व सर्व नागरिकांनी हजर राहावे असे आव्हान सांगोला तालुक्याचे कर्तव्यदक्ष तहसी-लदार संतोष कणसे यांनी केले आहे.

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी करण्याचे आवाहन**

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थ्यांची कागदपत्रे पडताळणी करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला आहे. त्यामुळे ज्या उमेदवारांनी दि.१० मार्च २०२५ किंवा त्यापूर्वी आपले सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केले असेल अशा प्रशिक्षणार्थींना उर्वरित पाच महिने कार्यप्रशिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या वाढीव ५ महिन्यांच्या कालावधीसाठी कार्य प्रशिक्षण घेण्यास इच्छुक उमेदवार तसेच सद्य:स्थितीत प्रशिक्षण घेत असलेले उमेदवार व योज-नेचा नव्याने लाभ घेण्यास इच्छुक उम ेदवारांनी आधार पडताळणी व आवश्यक कागदपत्रे ( उदा.आधार, शैक्षणिक पात्रता, वय, अधिवास प्रमाणपत्र इ.) तपासणी करुन घ्यावी, असे आव-ाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या दि.०९ जुलै २०२४ अन्वये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार प्रशिक्षणार्थी यांना सहा महिने कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येत होते. आता मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घोषित केल्यानुसार आता दि.१० मार्च २०२५ शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेअंतर्गत कार्य प्रशिक्षणार्थीचा प्रशिक्षण कार्यकाळ ६ महिने ऐवजी ११ महिने करण्यात आला.

या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थींचे विद्या-वेतन उ्ब्ढ द्वारे ऑनलाईन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे योजनेच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील प्रतिज्ञापत्राचा नमुना प्रशिक्षणार्थी व आस्थापना यांनी सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड-अलिबाग यांच्याकडे सादर करणे अनिवार्य आहे. यापुढे adhar Seeded DBT होऊ शकेल. त्यामुळे सर्व प्रशिक्षणार्थ्यांनी बँक खाते adhar Seeding करून घ्यावी.

तसेच ज्या आस्थापना हे या योजनेतंर्गत प्रशिक्षणार्थी घेण्यास इच्छूक आहेत त्या आस्थापनांची शासन निर्णयानुसार कार्य प्रशिक्षणार्थी सामावून घेण्याची क्षमता आवश्यक कागदपत्रांची तपासणी/पडताळणी करूनच उमेदवारांना आस्थापनेवर रुजू करून घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. दि.१० मार्च २०२५च्या शासन निर्णयानुसार आधार व कागदपत्र पडताळणी पूर्ण झाल्याशिवाय कोणत्याही प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणासाठी रुजू करुन घेण्यात येणार नाही. तसेच, प्रत्येक प्रशिक्षणार्थी यांची नोंदणी आधार पडताळणी (adhar Verify) अनिवार्य आहे. ज्या बँक अकाऊंट ला आधार लिंक आहे, तोच बँक अकाऊंट नंबर योजनेच्या विद्यावेतन उ्ब्ढ साठी नमुद करणे आवश्यक आहे.

प्रशिक्षणार्थ्यांच्या आध-ार पडताळणीची प्रक्रिया पुढीलप्रमाणे योजनेच्या https://www.cmykpy.mahaswayam.gov.in या वेबपोर्टलवरील Intern Login Sign up आधार नं. प्रविष्ट करणे- send OTP- Verify OTP The intern enters the received OTP Successful Login and ccess, Once OTP verification is successful, the intern gains access to the system.

सर्व इच्छुक कार्य प्रशिक्षणार्थी उम ेदवार आणि आस्थापनानी प्रशिक्षणार्थी यांनी आधार पडताळणी करणे तसेच आस्थापना/नियोक्ते यांनी कागदपत्रे तपासणीसाठी जिल्ह्याचे सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजग-ार उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,सोलापूर यांच्याशी दि.३० एप्रिल २०२५ पर्यंत संपर्क साधून आवश्यक ती तपासणी करून घ्यावी.

उमेदवारांना व आस्थापनांना त्याबाबत काही समस्या असल्यास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर या कार्यालयास ०२१७-२९९२९५६ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधवा.

# संकटग्रस्त बालकांच्या मदतीसाठी १०९८ हेल्पलाईनवर संपर्क साधावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : संकटात सापडलेल्या मुलांच्या मदतीसाठी १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सर्व दिवस चोवीस तास सुरू आहे. कुठेही बालक संकटात असल्याचे जाणवताच नागरिकांनी हेल्पलाईनचा वापर करून त्याला मदत करावी, असे आवाहन महिला व बालविकास आयुक्त नयना गुंडे यांनी केले आहे.

पुणे जिल्ह्यातील आळंदी व ठाणे जिल्ह्यातील खडबली येथे बेकायदेशीर बालगृहे, वसतिगृहे, अनाथाश्रम चालविले जात असलेबाबतच्या बातम्या प्रकाशित झालेल्या आहेत. तसेच सदर संस्थांमध्ये बालकांना अनधिकृतपणे डांबून ठेवण्यात येवून त्यांचे शारिरीक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या घटना घडत असल्याबाबतच्या बातम्या प्रसिध्द झालेबाबत निदर्शनास येत आहे. ही बाब हि अत्यंत गंभीर स्वरूपाची असून बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ तसेच महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदींचे उल्लंघन करणारी आहेत.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ आणि सुधारित अधिनियम २०२१ मधील कलम ४२ नुसार मान्यता तथा सोबतच्या नोंदणी प्रमाण-पत्राप्रमाणे नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त नसलेली संस्था अथवा अशी संस्था चालविणाऱ्या व्यक्तीला १ वर्षे कारावास तसेच रुपये १ लाखांपेक्षा कमी नसेल एवढा दंड किंवा दोन्हीही करण्यात येईल अशी तरतूद नमूद करण्यात आलेली आहे. नागरिकांनी आपल्या आसपासच्या परिसराम ध्ये अनधिकृत संस्था आढळून आल्यास जिल्ह्यातील जिल्हा म हिला व बाल विकास अधिकारी तसेच चाईल्ड हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९८ या वर संपर्क साधुन बालकांवरील शारिरीक तसेच लैंगिक अपराधास प्रतिबंध करण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहनही महिला व बाल विकास आयुक्त, नयना गुंडे यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री राष्ट्रीय प्रशिक्षण मेळाव्याचे २१ एप्रिलला आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : महात्मा बसवेश्वर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, विजापूर रोड, सोलापूर येथे दि. २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता आय.टी.आय. उत्तीर्ण, १२ वी उत्तीर्ण, डिप्लोमा व पदवीधर उत्तीर्ण प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रधानमंत्री राष्ट्रीय प्रशिक्षण (PMNAM) मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील सर्व आस्थापना व पात्र प्रशिक्षणार्थी यांनी मेळाव्यास उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र, द्वारा महात्मा बसवेश्वर शाासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार एस.आर.भालचिम यांनी केले आहे.

## थोडक्यात...

### अपार्टमेंटमधील वॉचमन सोबत बोलण्याचा रागातून मारहाण करून जीवे मारण्याची धमकी

सोलापूर, (प्रतिनिधी) : फ्लेरा अपार्टमेंट येथे कामाला असलेल्या वॉचमन सोबत बोलल्याचा राग मनात




भरून तू माझ्याशिवाय कोणासोबत बोलत जाऊ नको असे म्हणून फिर्यादी मनीषा शिवानंद तळळे (वय-३०,रा.गणेश सोसायटी,बालाजी मंगल कार्यालय जुळे सोलापूर) यांना हाताने मारहाण करून फिर्यादी यांची आई समजावून सांगत असताना त्यांना देखील धक्काबुक्की करून हातात तलवार घेऊन तुम्हाला सर्वांना खल्लास करतो असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली आहे.याप्रकरणी मनीषा तळळे यांनी अजित (पूर्ण नाव माहित नाही राहणार कल्याण नगर ) याच्याविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १४ ते १५ एप्रिल दरम्यान घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल भिसे हे करीत आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन समतेचा, मानवतेचा दीपस्तंभ : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## अमेरिकेत संयुक्त राष्ट्र संघ मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

न्यूयॉर्क : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार संपूर्ण जगाला प्रेरणदायी आहेत.संयुक्त राष्ट्र संघाचे जगाच्या शाश्वत विकासाचे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जगाला दिलेला समता स्वातंत्र्य बंधुता आणि मानवतेचा विचार मार्गदर्शक ठरणारा आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन हे समतेचा मानवतेचा दीपस्तंभ आहे.संपूर्ण विश्वाला सामाजिक न्यायाचा मार्ग दाखविणारे प्रेरणास्थान डॉ बाबासाहेब आंबेडकर आहेत असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी संयुक्त राष्ट्र संघात आयोजित डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या



जयंती सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून ना.रामदास आठवले यांनी आपले विचार मांडले. अमेरिका दौऱ्यात ना. रामदास आठवले यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ. सीमाताई आठवले; पुत्र जीत आठवले हे सोबत आहेत. अमेरिकेतील भारताचे कॉन्स्युल जनरल श्रीकांता प्रधान; युनोचे भारतचे प्रतिनिधी पर्वथनेनी हरीश यांनी ना.रामदास आठवले यांचे युनायटेड नेशन्स च्या न्यूयॉर्क मधील मुख्यालयात स्वागत केले.

न्यूयॉर्क चे महापौर एरिक डम्स यांनी १४ एप्रिल हा दिवस न्यूयॉर्क मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर दिन म्हणून साजरा करणारा आल्याची घोषणा ना.रामदास आठवले यांच्या उपस्थितीत केली. यावेळी अमेरिकेतील आंबेडकरवादी कार्यकर्ते दिलीप म्हस्के आणि दीपक बन्सल यांनी ना.रामदास आठवले यांचे स्वागत केले. अमेरिकेतील लाखो लोकांनी यंदा १४ एप्रिल रोजी महामानव डॉ. श्र.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमीत्त अमेरिकेत भारताचे केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिल्याबद्दल अमेरिकेत अनेक मान्यवरांनी ना.रामदास आठवले यांची भेट घेऊन त्यांचा सत्कार केला. न्यूयॉर्क मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या मुख्यालयात यंदा साजरी झालेली भीम जयंती ऐतिहासिक ठरली आहे.अमेरिकेतील भारतीयांना नवी उर्मी ताकद प्रेरणा देणारी भीम जयंती ठरली आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार जगाला प्रेरणा देणारा विचार असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने साजऱ्या केलेल्या भीम जयंती मुळे चिन्हांकित झालेल्या आहे याचा आम्हा सर्व भारतीयांना अभिमान असल्याचे ना.रामदास आठवले म्हणाले.

# विवेक विचार मंच व सहयोगी संस्था यांच्या वतीने जनसुरक्षा विशेष कायद्याची गरज याविषयी चर्चासत्र संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विवेक विचार मंच व सहयोगी संस्था यांच्या वतीने भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने महाराष्ट्र जनसुरक्षा विशेष कायद्याची गरज याविषयी एक चर्चासत्र शासकीय विश्रामगृहातील बैठक कक्षामध्ये आयोजित करण्यात आले होते, बैठकीची सुरुवात उद्देश पत्रिकेच्या वाचनाने करण्यात आली.

या बैठकीस अधिवक्ता परिषद तसेच इतर संस्था संघटना यांचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती,ड संदीप जाधव विधीज्ञ मुंबई हायकोर्ट यांनी हा विषय मांडला, त्यानंतर उपस्थित प्रतिनिधी बरोबर या कायद्याविषयी चर्चाही करण्यात आली. त्यातील काही मुद्दे पुढीलप्रमाणे....

- हा अंतर्गत सुरक्षेशी संबंधित कायदा असून नक्षलवादी / माओवादी तसेच अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या संघटना आणि व्यक्ती वर कारवाई करण्यासाठी आहे.

- महाराष्ट्रात असा कायदा नसल्यामुळे अंतर्गत सुरक्षेला धोका पोहोचणाऱ्या संगठन आणि व्यक्ती विरोधात कारवाई करताना महाराष्ट्र पोलीस तसेच इतर सुरक्षा यंत्रणांना केंद्र सरकारच्या कायद्यांचा आधार घेऊन कारवाई करावी लागते.

- केंद्राच्या कायद्यानुसार कारवाई करताना महाराष्ट्रातील सुरक्षा यंत्रणांना अनेक प्रशासनिक अडचणी तसेच पूर्व परवानगीचे अडसर आहे. त्यामुळे नक्षलवादी, अंतर्गत सुरक्षेला धोका पोहोचवणारे इतर संगठन यांच्या विरोधात परिणामकारक कारवाई शक्य होत नाही, अनेक वेळेला आरोपी न्यायालयातून सुटून जायचे. उदा. साईबाबा प्रकरण त्यामुळे महाराष्ट्राचा स्वतःचा विशेष कायदा असावा अशी मागणी अनेक वर्षांपासून होत होती. सर्वांनीच या कायद्याचे समर्थन केले. सदर चर्चासत्रामध्ये ड. विशाल बगाडे, अधिवक्ता परिषदेचे ॲड.गवई सर, ॲड.महिंद्रकर सर व अधिवक्ता परिषदेचे सदस्य, तसेच संस्था प्रतिनिधी प्रवीण कांबळे, मारेप्पा कंपली, नितीन कांबळे, सुरज शिंदे व अन्य संस्था प्रतिनिधीही उपस्थित होते. विवेक विचार मंचचे जिल्हा संयोजिका अश्विनी चव्हाण, शहर संयोजक प्रशांत कांबळे, ॲड वैशाली महिंद्रकर, प्रीती उडाणशिव, गौरी आमडेकर, ॲड.संदेश देवकर सिद्धांत बाबरे, नितेश उडाणशिव, धीरज हजारे आदी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सम्यक विद्यार्थी आंदोलन अक्कलकोटच्या वतीने उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनीधी : अक्कलकोट येथे सी,बी खेडगी महाविद्यालयात सम्यक विद्यार्थी आंदोलनच्या वतीने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना मिठाईवाटप करण्यात आले.

कार्यक्रमात सम्यक विद्यार्थी आंदोलन महाराष्ट्र राज्य प्रवक्ता रविराज पोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले सामाजिक समतेच्या लढ्यात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले.

यावेळी आकाश गायकवाड, गंगाराम वाघमारे, दर्शन गायकवाड, श्रीधर दसाडे, सम्राट सोनकांबळे, सागर मस्के, महेश बनसोडे, प्रीती जैनजांगडे, लक्ष्मी गजधाने, सृष्टी गायकवाड, यल्लाप्पा शिंदे, सागर गायकवाड आदीसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# २५ एप्रिल रोजी जागेवर निवड संधी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर येथील मॉडल करिअर सेंटर येथे शुक्रवार दि. २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा. पर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थ कोट, पार्क चौक, सोलापूर येथे नोकरी इच्छुक उमेदवारांकरीता जागेवर निवड संधी चे आयोजन करण्यात येणार असून, सदर जागेवर निवड संधी (PLACEMENT DRIVE) मध्ये जिल्हयातील कीया मोटर्स सोलापूर आणि किरण एन्टरप्राईसेस, सोलापूर हे उद्योजक सहभागी होऊन, प्रत्यक्ष मुलाखतीव्दारे उमेदवारांची निवड करणार आहेत. या जागेवर निवड संधी (PLACEMENT DRIVE) मध्ये आय. टी. आय. प्रकारच्या शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांना जागेवर नोकरीची संधी उपलब्ध होणार आहे.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यंत नोंदणी केली नसल्यास www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावी. तसेच लॉगीन करुन शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्तपदांसाठी अर्ज करुन वरील ठिकाणी उपस्थित राहुन प्रत्यक्ष मुलाखती देण्यात याव्या, तसेच www.ncs.gov.in या वेबसाईटवर जास्तीत जास्त उमेदवांनी सहभाग नोंदवावा व संधीचा लाभ घ्यावा.अधिक माहितीसाठी ०२१७-२९९२९५६ या क्रमांकावर साधावा.

तरी इच्छूक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पुर्ण करून रोजगाराच्या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, सोलापूर श्रीमती संगीता खंदारे, यांनी केले आहे.

# सेना दलात अधिकारी पदाचे मोफत पूर्व प्रशिक्षण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (Service Selection Board) या परीक्षेची पूर्व तयारी करून घेण्यासाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे मोफत प्रशिक्षण वर्ग घेण्यात येणार आहे. यासाठी प्रवेश घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सोलापूर यांनी केले आहे.



शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व नवयुवतींसाठी दिनांक ५ मे ते १४ मे २०२५ या कालावधीत SSB कोर्स क्र.६१ आयोजित करण्यात आला आहे. या कालावधीत प्रशिक्षणार्थींना नि:शुल्क प्रशिक्षण , निवास व भोजन दिले जाणार आहे.

सोलापूर जिल्हयातील इच्छूक उमेदवारांनी सैन्य दलातील अधिकारी पदांची संधी उपभोगण्यासाठी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर येथे दि. २४ एप्रिल २०२५ रोजी मुलाखतीस हजर रहावे. मुलाखतीस येते वेळी त्यांनी डिपार्टमेंट ऑफ सैनिक वेल्फअर, पुणे (DSW) यांच्या वेबसाईट वर सर्च करून त्यामधील SSB-61 कोर्स साठी (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे प्रिंट दिलेल्या) प्रवेशपत्र व त्यासोबत असलेली परिष्टांची प्रिंट घेऊन व ते पूर्ण भरून सोबत घेऊन यावे.

एसएसबी वर्गामध्ये प्रवेश मिळण्यासाठी पुढीलप्रमाणे नमूद कोणतीही एक पात्रता असणेआवश्यक आहे. त्यासंबंधीचे पात्रता प्रमाणपत्र प्रशिक्षण वर्गाला येताना घेवून यावे

प्रशिक्षणार्थी कम्बाईड डिफेन्स सर्व्हीसेस एक्झामिनेशन (CDSE-UPSE) अथवा नॅशनल डिफेन्स केडमी एक्झामिनेशन (NDA-UPSE) पास झालेली असावी व त्यासाठी सर्व्हिसेस सिलेक्शन बोर्ड मुलाखतीसाठी पात्र झालेले असावे. व त्यासाठी एनसीसी उ सर्टिफिकेट किंवा इ ग्रेड मध्ये पास झालेली असावेत व एनसीसी ग्रुप हेडक्कार्टरने एसएसबी साठी शिफारस केलेली असावी. टेक्निकल ग्रॅज्यूएट कोर्स साठी एसएसबी मुलाखतीसाठी कॉल लेटर असावे. विद्यापिठ प्रवेश प्रणाली (युनिर्व्हसिटी इनट्री स्कीम) साठी एसएसबी कॉल लेटर असावे किंवा एसएसबी साठी शिफारस केलेल्या यादीत नाव असावे.

अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी छात्र प्रशिक्षण केंद्र नाशिक रोड नाशिक यांचा ई मेल आडी training.pctcnashik@gmail.com व दुर्ध्वनी क्र.०२५३-२४५१०३२ किंवा व्हाटसअप क्र. ९१५६०७३३०६ वर कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष अथवा दूर्ध्वनीवर संपर्क करावा असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

### रक्तदान शिबीरात नागरीकासह पत्रकार व पोलीस अधिकाऱ्यांचा सहभाग

### ३४ लाभार्थ्यांनी रक्तदानासाठी सहभाग नोंदविला

# महामानवाच्या जयंत्ती निमीत्त नळदुर्ग येथे रक्तदान शिबीर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नळदुर्ग येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

प्रथमत तथागत भगवान गौतम बुद्ध बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पूजन बालाघाट शिक्षण संस्थेचे संजय संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नळदुर्ग येथील प्राचार्य डॉ. सुभाष राठोड, प्रा. डॉ. दीपक जगदाळे प्रा डॉ दयानंद भोवाळ, प्रा काळे यांच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर रक्तदान शिबिराला सुरुवात करण्यात आले.



महात्मा बसवेश्वर महाराज बल्ड सेंटर यांच्या माध्यातुन ३४ लाभार्थ्यांनी रक्तदानासाठी सहभाग नोंदविला.

यूवक नागरीका सह पोलीस अधिकाऱ्यांनी ही सहभाग नोंदविला. यावेळी नळदुर्ग ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक ईश्वर नांगरे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रितमकुमार पुजारी, डॉ आंबेडकर, इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक तथा मुख्य प्रवर्तक मारुती खारवे, रिपाईचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, पत्रकार दादासाहेब बनसोडे, पत्रकार आयुब शेख, दिलीप भांगे, सिद्धार्थ सुरवसे, अमोल श्याम कांबळे, अमोल चंद्रकांत कांबळे, साक्षी किशोर नळदुर्गकर, सचिन बनसोडे, स्वप्निल वाघमारे, योगेश सुरवसे प्रशिक बनसोडे, सुनीता माणिक सावंत, माधवी तुळशीराम रणे , महेश बनसोडे, ऋषिकेश कांबळे, नामदेव उत्तम झेंडारे, गणेश दूरुगकर, सत्यजित परमेश्वर गोपने, शरीफ सय्यद, रंगनाथ पिस्के, सोहन गायकवाड, प्रजित सुरवसे, नागेश सुतार, तारोद्दीन रहीम सय्यद, रमेश साधु जेटीथोर, शिक्षाताई रमेश जेटीथोर, सुनिल कांबळे सह अनेकांनी रक्तदान करण्याकरिता प्रतिसाद दिला. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती सार्वजनिक जयंती उत्सव कमिटीचे प्रमुख राजरत्न बनसोडे, सम्यक संस्थेचे अध्यक्ष मारुती खारवे, माजी नगरसेवक किशोर बनसोडे, सहशिक्षक सचिन कांबळे, राजेश बनसोडे, अमर बनसोडे, किशोर के बनसोडे बाबासाहेब बनसोडे, प्रशिक बनसोडे, योगेश सुरवसे,अतुल बनसोडे, अमोल कांबळे, योगेश दुरुगकर राजेंद्र कांबळे आदीनी रक्तदानासाठी आलेल्या सर्व रक्तदात्यांचा महात्मा बसवेश्वर महाराज ब्लड सेंटरच्या



वतीने प्रमाणपत्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक मध्यवर्ती जयंती उत्सव कमिटीच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्धांची प्रदीप्त मूर्ती व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.

महात्मा बसवेश्वर महाराज ब्लड सेंटरचे पि आर ओ संतोष थोरात, वैभव शिंदे, भाऊ शिंदे, भावना कांबळे, सलोनी कांबळे, वतीने मंडळाचा सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दादासाहेब बनसोडे यांनी केले तर शेवटी आभार सचिन कांबळे यांनी मानले.